Epaper

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल

MSME - MH-33 -0714843

दैनिक **जन सम्राट टाईम्स**

सत्याचे प्राईम्स

मुख्य संपादक: **मुकुंदराव शामराव नंन्नवरे**


**जिल्ह्यात कापूस पेरणीने ओलांडला ५७ टक्क्यांचा टप्पा!**

(पान २ वर)




। शुक्रवार, दि. १० जूलै २०२६ । वर्ष १ ।अंक ९२ ।पाने २। Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION


Selected

### जुन्या वादातून तरुणावर लाकडी काठीने हल्ला

जळगाव | जुन्या वादातून नशिराबाद येथील भवानी नगर परिसरात एका ३२ वर्षीय तरुणावर लाकडी काठीने हल्ला करून मारहाण करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. या हल्ल्यात तरुणाच्या उजव्या खांद्याला व हाताला दुखापत झाली असून, नशिराबाद पोलिसांनी एका संशयिताविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बापू सुपडू भोई (वय ३२, रा. भवानी नगर, नशिराबाद) हे ४ जुलै रोजी सकाळी सुमारे ७ वाजता परिसरात असताना जुन्या भांडणाच्या कारणावरून त्यांच्यावर लाकडी काठीने हल्ला करण्यात आला. या मारहाणीत त्यांच्या उजव्या खांद्याला आणि हाताला दुखापत झाली. घटनेनंतर जखमी बापू भोई यांनी ७ जुलै रोजी नशिराबाद पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. त्यांच्या तक्रारीवरून गणेश प्रकाश कोळी (रा. भवानी नगर, नशिराबाद) याच्याविरुद्ध संबंधित कलमान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## शिंदे गट भाजपमध्ये विलीन होऊ शकतो; पृथ्वीराज चव्हाणांच्या विधानाने राजकीय चर्चांना उधाण

# फडणवीस केंद्रात, शिंदे पुन्हा मुख्यमंत्री?'

## केंद्रीय मंत्रिमंडळ विस्तार, महाराष्ट्रातील सत्तासमीकरणे आणि अर्थव्यवस्थेवरही साधला निशाणा

**जन सम्राट टाईम्स**

**मुंबई । महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा सत्तासमीकरणांच्या चर्चांना वेग आला असून, माजी मुख्यमंत्री तथा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी केलेल्या एका वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात नव्या तर्कवितर्कांना उधाण आले आहे.**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केंद्रात पाठवून एकनाथ शिंदे यांना पुन्हा महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदाची जबाबदारी दिली जाऊ शकते, अशा चर्चा आपण ऐकल्याचे चव्हाण यांनी म्हटले आहे. मात्र, ही अधिकृत माहिती नसून केवळ राजकीय चर्चाच असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.बीबीसी मराठीला दिलेल्या मुलाखतीत बोलताना पृथ्वीराज चव्हाण यांनी केंद्रीय मंत्रिमंडळाच्या संभाव्य फेरबदलाच्या चर्चांवर भाष्य केले. "माध्यमांमधून देवेंद्र फडणवीस यांना दिल्लीत केंद्रीय मंत्रिमंडळात स्थान मिळू शकते, अशा बातम्या समोर येत आहेत. मात्र, त्या कितपत सत्य आहेत, हे सांगता येणार नाही. मी ऐकलेल्या चर्चांनुसार शिंदे गट भाजपमध्ये विलीन करून एकनाथ शिंदे यांना पुन्हा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री केले जाऊ शकते. त्यांच्या पुत्रालाही केंद्रीय मंत्रिमंडळात स्थान मिळू शकते. मात्र, या केवळ चर्चा असून त्याबाबत कोणतीही अधिकृत माहिती माझ्याकडे नाही," असे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी चव्हाण यांनी राज्यातील पक्षांतराच्या राजकारणावरही टीका केली. "आमदारांची फोडाफोडी ही वैचारिक कारणांमुळे झाली का? मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी छातीठोकपणे सांगावे की त्यामागे आर्थिक व्यवहार नव्हते. सरकार स्थापन करणे, सरकार पाडणे, आमदार फोडणे, हे सर्व केवळ राज्याच्या पातळीवर घडले नाही. यामागे केंद्रातील नेतृत्वाची भूमिका होती," असा आरोप त्यांनी केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यावरही त्यांनी अप्रत्यक्षपणे निशाणा साधला. "महाराष्ट्रात जे काही घडले ते केंद्राच्या आशीर्वादाशिवाय शक्यच नव्हते. पक्षांतरबंदी कायद्याची पायमल्ली होत असताना केंद्र सरकारला त्याची माहिती नव्हती, असे होऊच शकत नाही," असे ते म्हणाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संभाव्य दिल्लीतील भूमिकेबाबत बोलताना चव्हाण म्हणाले, "फडणवीस यांच्यासाठी हा धोका आहे असे मला वाटत नाही. त्यांना केंद्रात जायचे आहे की नाही, हा त्यांचा वैयक्तिक आणि पक्षाचा निर्णय आहे. माध्यमांमध्ये केंद्रीय मंत्रिमंडळ विस्ताराच्या अनेक चर्चा सुरू आहेत. प्रत्यक्षात काय घडते, हे लवकरच स्पष्ट होईल." मुलाखतीदरम्यान त्यांनी केंद्र सरकारच्या आर्थिक धोरणांवरही टीका केली. देशाच्या जीडीपीच्या आकडेवारीवर विश्वास राहिलेला नसल्याचा दावा करत त्यांनी नोबेल पुरस्कार विजेते अर्थतज्ज्ञ अभिजीत बॅनर्जी तसेच माजी केंद्रीय आर्थिक सल्लागारांच्या मतांचा उल्लेख केला. देशाची अर्थव्यवस्था, परराष्ट्र धोरण आणि चीन-पाकिस्तानविषयी केंद्र सरकारच्या भूमिकेवरही त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले.



### 'ही अधिकृत माहिती नसून राजकीय चर्चाच'

दरम्यान, पृथ्वीराज चव्हाण यांच्या या विधानानंतर महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात पुन्हा एकदा मुख्यमंत्रीपद, केंद्रीय मंत्रिमंडळ विस्तार आणि महायुतीतील संभाव्य सत्तासमीकरणांबाबत चर्चांना उधाण आले आहे. मात्र, या सर्व चर्चांवर अद्याप भाजप, शिवसेना किंवा संबंधित नेत्यांकडून कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. त्यामुळे या चर्चा प्रत्यक्षात येतात की केवळ राजकीय तर्कवितर्क ठरतात, याकडे राज्याच्या राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

## नशिराबादमध्ये पेव्हर ब्लॉक कामात भ्रष्टाचार

### कामाची उच्चस्तरीय चौकशीची मागणी

**जन सम्राट टाईम्स**



**नशिराबाद | प्रतिनिधी:** नशिराबाद शहरातील गणेश नगर भागात पेव्हर ब्लॉक बसवण्याच्या कामात मोठा भ्रष्टाचार झाल्याचा गंभीर आरोप स्थानिक रहिवासी देवेंद्र भंगाळे यांनी केला आहे.

संबंधीत ठेकेदाराने यांनी केलेले काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे असून, या कामाची जळगाव जिल्हा बांधकाम विभाग आणि नाशिक आयुक्त यांच्या तांत्रिक पथकाद्वारे उच्चस्तरीय चौकशी करून संबंधितांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

**काय आहे प्रकरण?**

गणेश नगर भागात पेव्हर ब्लॉक बसवण्याच्या कामासाठी ९,९६,९३६ रुपयांचा निधी मंजूर झाला होता. त्यापैकी संबंधित ठेकेदाराला जीएसटी वजा करून ८,०१,२२४ रुपयांची रक्कम अदा करण्यात आली आहे. मात्र, या कामात नियमांचे उल्लंघन झाल्याचा आरोप तक्रारदाराने केला आहे. तक्रारदाराचे मुख्य आरोप: निकृष्ट दर्जाचे साहित्य: कंत्राटदाराने वापरलेले पेव्हर ब्लॉक अत्यंत कमी दर्जाचे आणि स्वस्त आहेत. नियमबाह्य पीसीसी (PCC) काम: ब्लॉक बसवण्यापूर्वी केलेले पीसीसीचे बेस काम पूर्णपणे निकृष्ट दर्जाचे आहे. आर्थिक तफावत: प्रत्यक्ष जागेवर २२ मीटर रुंदी आणि ३२ मीटर लांबी इतकेच काम झाले आहे. जर या कामाचे मूल्य बाजारभावानुसार काढले, तर ते केवळ ३,७५,००० रुपयांच्या घरात येते. म्हणजेच, शासकीय निधीचा मोठा अपहार झाल्याचा स्पष्ट आरोप तक्रारदाराने केला आहे. पर्यवेक्षणाचा अभाव: हे काम सुरू असताना किंवा पूर्ण झाल्यावर कोणत्याही जबाबदार अधिकाऱ्याने किंवा अभियंत्याने जागेवर जाऊन पाहणी (INSPECTION) केलेली नाही. या कामाबाबतचे फोटो आणि इतर पुरावे अर्जासोबत जोडण्यात आले आहेत. या प्रकरणाची दखल घेऊन तातडीने चौकशीचे आदेश द्यावेत, अशी मागणी तक्रारदार देवेंद्र भंगाळे यांनी केली आहे. या तक्रारीची प्रत जिल्हाधिकारी (जळगाव), नाशिक विभागीय आयुक्त आणि जिल्हा बांधकाम विभागालाही पाठवण्यात आली आहे.

## अपात्र संचालकांकडून भरतीचे निर्णय? जळगाव जिल्हा बँकेच्या शिपाई भरतीवर प्रश्नचिन्ह

**जन सम्राट टाईम्स**

**जळगाव :** राज्य शासनाने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमधील चतुर्थश्रेणी शिपाई पदाच्या भरती प्रक्रियेत महत्त्वपूर्ण बदल करत नवीन पूरक शासनपत्र जारी केले आहे. या निर्णयानुसार शिपाई पदासाठी ऑनलाइन भरती रद्द करून ऑफलाइन पद्धतीने लेखी परीक्षा व मुलाखतीद्वारे भरती करण्यात येणार असून स्थानिक उमेदवारांना १०० टक्के प्राधान्य देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. नवीन नियमांनुसार शिपाई पदासाठी किमान शैक्षणिक पात्रता बारावी उत्तीर्ण निश्चित करण्यात आली असून उमेदवारांची निवड ७० गुणांच्या लेखी परीक्षा व ३० गुणांच्या मौखिक मुलाखतीच्या आधारे होणार आहे.

भरती प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक राहावी म्हणून परीक्षा तज्ज्ञ संस्थेमार्फत घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. दरम्यान, जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाबाबत नव्याने प्रश्न उपस्थित होत आहेत.

बँकिंग रेग्युलेशन (सुधारणा) अधिनियम, २०२५, रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सूचना तसेच राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या निर्देशांच्या अनुषंगाने सहकार आयुक्त कार्यालयाने या प्रकरणाची नोंद घेत संबंधित विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांना आवश्यक ती तातडीची कार्यवाही करण्याचे निर्देश दिल्याचा दावा करण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर, जर संचालक मंडळाच्या वैधतेबाबत प्रशासकीय स्तरावर कार्यवाही सुरू असेल, तर अशा परिस्थितीत त्याच संचालक मंडळाकडून नवीन भरती प्रक्रियेबाबत निर्णय घेण्याचा अधिकार आहे का? असा प्रश्न विविध स्तरातून उपस्थित केला जात आहे. या विषयावर संबंधित विभागाने अद्याप अधिकृत अंतिम निर्णय जाहीर केलेला नसून, भरती प्रक्रिया सुरू करण्यापूर्वी संचालक मंडळाच्या अधिकारांबाबत कायदेशीर व प्रशासकीय स्थिती स्पष्ट करावी, अशी मागणी होत आहे. यासंदर्भात सहकार विभाग, रिझर्व्ह बँक आणि संबंधित प्राधिकरण काय भूमिका घेतात, याकडे इच्छुक उमेदवारांसह सहकार क्षेत्राचे लक्ष लागले आहे.



### महत्त्वाचे मुद्दे

- शिपाई भरतीसाठी नवीन शासन निर्णय लागू.
- ऑनलाइनऐवजी ऑफलाइन परीक्षा व मुलाखत.
- स्थानिक उमेदवारांना १००% प्राधान्य.
- सहकार आयुक्तांच्या निर्देशांच्या पार्श्वभूमीवर भरती निर्णयाच्या वैधतेबाबत चर्चा.
- संबंधित अधिकाऱ्यांच्या पुढील निर्णयाकडे सर्वांचे लक्ष.

## रोटरी क्लब ऑफ जळगाव ईस्टच्यावतीने विद्यार्थिनींना शैक्षणिक साहित्याचे वाटप!

**जन सम्राट टाईम्स**

**नशिराबाद प्रतिनिधी :** रोटरी क्लब ऑफ जळगाव ईस्टच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत शैक्षणिक उपक्रम राबवण्यात आला. या अंतर्गत न्यू इंग्लिश स्कूल, नशिराबाद येथील गरजू व होतकरू सहा विद्यार्थिनींना रोटरी क्लबने या शैक्षणिक वर्षासाठी दत्तक घेतले असून, त्यांना शैक्षणिक साहित्याचे किट प्रदान करण्यात आले. या उपक्रमांतर्गत रोटरी ईस्टचे सदस्य श्री. मधुकर चौबे आणि श्री. सुशील असोफा यांच्या हस्ते विद्यार्थिनींना आवश्यक शैक्षणिक साहित्य आणि वस्तूंचे किट वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या वेळी बोलताना रोटरी ईस्टचे अध्यक्ष डॉ. मनोज चौधरी यांनी रोटरी क्लबच्या कार्याचा आढावा घेतला. तसेच, विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी लवकरच शाळेत विशेष 'मेडिकल चेकअप कॅम्प'चे आयोजन करण्यात येणार असल्याची घोषणा त्यांनी केली. याप्रसंगी रोटरी ईस्टच्या प्रेसिडेंट पूजा अग्रवाल, सदस्य श्री. सुशील असोफा, श्री. राहुल सिंग तसेच नशिराबाद शिक्षण मंडळाचे कार्याध्यक्ष योगेश पाटील, सचिव मधुकर चौबे, अध्यक्ष डॉ. विकास चौधरी, संचालक जनार्दन माळी, राजेश पाटील, ॲड. प्रदीप देशपांडे आणि मुख्याध्यापिका श्रीमती एस. ए. बनसोडे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि उपस्थितांचे आभार राजू पाचपांडे यांनी मानले. या उपक्रमाचे सर्वस्तरातून कौतुक होत आहे.



## पान मसाल्याचे दुकान फोडून सिगारेटचे बॉक्स व रोकड लंपास

**जळगाव | प्रतिनिधी :** जळगाव शहरातील पिंप्राळा परिसरातील सोमानी मार्केटमध्ये अज्ञात चोरट्यांनी पान मसाल्याचे दुकान फोडून सिगारेटचे बॉक्स आणि रोकड असा एकूण ३७ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल लंपास केल्याची घटना बुधवारी सकाळी उघडकीस आली. याप्रकरणी रामानंदनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी तपास सुरू केला आहे. मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी दुकानाचे कुलूप तोडून आत प्रवेश केला आणि दुकानातील सिगारेटचे बॉक्स तसेच गल्ल्यातील रोकड चोरून नेली.

## ‘प्रगती महिला प्रभाग संघाची’ वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात

### वार्षिक लेखापरीक्षण अहवालास मंजुरी



**जन सम्राट टाईम्स**

**शहादा | प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) अंतर्गत शहादा तालुक्यातील पाडळदा येथील ‘प्रगती महिला प्रभाग संघ, पाडळदा’ यांची वार्षिक सर्वसाधारण सभा ८ जुलै २०२६ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. प्रभाग संघाच्या अध्यक्षा श्रीमती रंजनाबाई विक्रम पाडवी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित या सभेत महिला सक्षमीकरण, आर्थिक स्वावलंबन आणि बचत गटांच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते देव मोगरा माता व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन आणि दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर "इतनी शक्ती हमें देना दाता..." या प्रार्थनेने सभेला सुरुवात करण्यात आली. प्रभाग समन्वयक विलास पवार यांनी प्रभाग संघाच्या विविध उपक्रमांची प्रस्तावना मांडली.

त्यानंतर प्रभाग संघाच्या लेखापाल प्रियंका किरमा वळवी यांनी सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाचा वार्षिक लेखापरीक्षण अहवाल सादर केला. उपस्थित सदस्यांनी या अहवालाला सर्वानुमते मंजुरी दिली. यावेळी तालुका अभियान व्यवस्थापक ईश्वर जगदाळे, प्रभाग समन्वयक योगेश पाटील आणि संदीप महाजन यांनी महिलांच्या आर्थिक स्वावलंबन, स्वयंरोजगार आणि सामाजिक प्रगतीसंदर्भात मार्गदर्शन केले. तसेच ‘लखपती दीदी’ झालेल्या महिला सदस्यांनी आपल्या यशोगाथा सांगून इतर महिलांना प्रेरित केले.

प्रभाग समन्वयक विलास पवार यांनी प्रभाग संघाच्या विविध उपक्रमांची प्रस्तावना मांडली. त्यानंतर प्रभाग संघाच्या लेखापाल प्रियंका किरमा वळवी यांनी सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाचा वार्षिक लेखापरीक्षण अहवाल सादर केला. कार्यक्रमात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या आयसीआरपी, बँक सखी, नियमित कर्ज परतफेड करणारे स्वयं सहाय्यता बचत गट तसेच सामाजिक समावेशन, उद्योग-व्यवसाय आणि आर्थिक शिस्त जोपासणाऱ्या ग्रामसंघांचा मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. सभेला प्रभाग संघाच्या सचिव रोहिणी राजेश अहिरे, खजिनदार राजश्री माणिलाल पाटील, तालुका व्यवस्थापक ईश्वर जगदाळे, बीएम दिलीप बैसाने, किशोर बिरारे, सहकारी प्रभाग समन्वयक राजेश देवकर, योगेश कोळी, निखिल शिर्के, पुरुषोत्तम बागुल, भीमा कोळी, विद्या वसावे, सुचिता सूर्यवंशी तसेच उद्यम संस्थेच्या पूजा जगडे यांच्यासह प्रभागातील सर्व आयसीआरपी, बँक सखी, ग्रामसंघांचे पदाधिकारी आणि बचत गटांतील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेश देवकर यांनी केले, तर दिलीप बैसाने यांनी आभार प्रदर्शन केले. ठरलेल्या विषयपत्रिकेनुसार सभा यशस्वीरित्या पार पडली.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

## बिलाडी-बामखेडा रेशन दुकानावर धान्य वितरणात गैरव्यवहाराचा आरोप


## बिलाडी-बामखेडा रेशन दुकानावर धान्य वितरणात गैरव्यवहाराचा आरोप


**जन सम्राट टाईम्स**

**शहादा | प्रतिनिधी :** शहादा तालुक्यातील बिलाडी (ता. शहादा) आणि बामखेडा (ता. शहादा) येथील रेशन दुकानाच्या कारभाराबाबत नागरिकांनी गंभीर तक्रारी करत धान्य वितरणात गैरव्यवहार होत असल्याचा आरोप केला आहे. संबंधित रेशन दुकानाचा परवाना रद्द करून चौकशी करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, शासनाच्या नियमानुसार अंत्योदय शिधापत्रिकाधारकांना २१ किलो गहू आणि १४ किलो तांदूळ मिळणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात कमी प्रमाणात धान्य वितरित केले जात आहे. तसेच बायोमेट्रिक पडताळणी करूनही धान्य वितरणाची छापील किंवा ऑनलाइन पावती दिली जात नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. हक्काचे धान्य मागणाऱ्या लाभार्थ्यांना शिधापत्रिका बंद करण्याची धमकी दिली जात असल्याचाही दावा नागरिकांनी केला आहे. याशिवाय, बिलाडी आणि बामखेडा या दोन्ही गावांसाठी स्वतंत्र रेशन दुकानांचे परवाने असतानाही प्रत्यक्षात दोन्ही दुकानांचा कारभार बिलाडी येथील एकाच खोलीतून चालवला जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे बामखेडा येथील नागरिक, विशेषतः वृद्ध महिला आणि दिव्यांगांना रेशन घेण्यासाठी दुसऱ्या गावात जावे लागत असल्याने त्यांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी आणि गैरव्यवहार सिद्ध झाल्यास संबंधित रेशन दुकानदाराचा परवाना रद्द करावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. तसेच या प्रकरणात पुरवठा विभाग आणि तहसील प्रशासन कोणती भूमिका घेते, याकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.



### रेशन दुकानदाराचा परवाना रद्द करावा

संबंधित रेशन दुकानाचा परवाना रद्द करून चौकशी करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, शासनाच्या नियमानुसार अंत्योदय शिधापत्रिकाधारकांना २१ किलो गहू आणि १४ किलो तांदूळ मिळणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात कमी प्रमाणात धान्य वितरित केले जात आहे. तसेच बायोमेट्रिक पडताळणी करूनही धान्य वितरणाची छापील किंवा ऑनलाइन पावती दिली जात नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. हक्काचे धान्य मागणाऱ्या लाभार्थ्यांना शिधापत्रिका बंद करण्याची धमकी दिली जात असल्याचाही दावा नागरिकांनी केला आहे. याशिवाय, बिलाडी आणि बामखेडा या दोन्ही गावांसाठी स्वतंत्र रेशन दुकानांचे परवाने असतानाही प्रत्यक्षात दोन्ही दुकानांचा कारभार बिलाडी येथील एकाच खोलीतून चालवला जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे बामखेडा येथील नागरिक, विशेषतः वृद्ध महिला आणि दिव्यांगांना रेशन घेण्यासाठी दुसऱ्या गावात जावे लागत असल्याने त्यांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी आणि गैरव्यवहार सिद्ध झाल्यास संबंधित रेशन दुकानदाराचा परवाना रद्द करावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# घरकुलांच्या कामात दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही; अधिकाऱ्यांना सीईओ करिश्मा नायर यांचा अल्टिमेटम!

## निष्काळजी अधिकाऱ्यांवर थेट प्रशासकीय कारवाईचा इशारा

जन सम्राट टाईम्स

**जळगाव :** पंतप्रधान आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत मंजूर झालेल्या आणि अद्याप अपूर्ण असलेल्या घरकुलांची कामे तातडीने पूर्ण करण्यासाठी ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी जबाबदारीने काम करावे. कामात दिरंगाई, टाळाटाळ किंवा निष्काळजीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणतीही दया न दाखवता थेट प्रशासकीय कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी करिश्मा नायर यांनी दिला. पाचोरा पंचायत समितीच्या सभागृहात आयोजित ग्रामपंचायत अधिकारी आणि ग्रामीण गृहनिर्माण अधिकाऱ्यांच्या आढावा बैठकीत त्या बोलत होत्या. या बैठकीला जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक आर. एस. लोखंडे, गटविकास अधिकारी एस. एस. मुंडे तसेच पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावरील संबंधित अधिकारी उपस्थित होते. बैठकीत पाचोरा तालुक्यातील गावनिहाय मंजूर, पूर्ण आणि अपूर्ण घरकुलांच्या प्रगतीचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

पहिला आणि दुसरा हप्ता मिळूनही अनेक लाभार्थ्यांची घरे अपूर्ण का आहेत, याची कारणमीमांसा करण्यात आली. तसेच अतिक्रमण, जागेचा अभाव, तांत्रिक अडचणी आणि इतर कारणांमुळे रखडलेल्या घरकुलांच्या प्रकरणांवरही सखोल चर्चा करण्यात आली. करिश्मा



नायर यांनी अधिकाऱ्यांना प्रत्येक लाभार्थ्याशी सातत्याने संपर्क ठेवून त्यांच्या अडचणी समजून घेण्याच्या सूचना दिल्या.

महसूल विभाग, ग्रामपंचायत आणि स्थानिक प्रशासन यांच्या समन्वयातून सर्व अडथळे दूर करून घरकुलांची कामे तातडीने पूर्ण करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

घरकुलांच्या कामात कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा सहन केला जाणार नसल्याचे स्पष्ट करत, कामाच्या प्रगतीचा नियमित आढावा घेतला जाईल, असेही त्यांनी सांगितले. अपेक्षित कामगिरी न करणाऱ्या ग्रामपंचायत अधिकाऱ्यांवर थेट प्रशासकीय कारवाई करण्यात येईल, असा इशारा त्यांनी बैठकीत दिला. पंतप्रधान आवास योजनेचा लाभ पात्र लाभार्थ्यांना वेळेत मिळावा आणि प्रत्येक मंजूर घरकुल पूर्णत्वास जावे, यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचे त्यांनी नमूद केले.

### हप्ता मिळूनही लाभार्थ्यांची घरे अपूर्ण का ?

पाचोरा पंचायत समितीच्या सभागृहात आयोजित ग्रामपंचायत अधिकारी आणि ग्रामीण गृहनिर्माण अधिकाऱ्यांच्या आढावा बैठकीत त्या बोलत होत्या. या बैठकीला जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक आर. एस. लोखंडे, गटविकास अधिकारी एस. एस. मुंडे तसेच पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावरील संबंधित अधिकारी उपस्थित होते. बैठकीत पाचोरा तालुक्यातील गावनिहाय मंजूर, पूर्ण आणि अपूर्ण घरकुलांच्या प्रगतीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. पहिला आणि दुसरा हप्ता मिळूनही अनेक लाभार्थ्यांची घरे अपूर्ण का आहेत, याची कारणमीमांसा करण्यात आली. तसेच अतिक्रमण, जागेचा अभाव, तांत्रिक अडचणी आणि इतर कारणांमुळे रखडलेल्या घरकुलांच्या प्रकरणांवरही सखोल चर्चा करण्यात आली. महसूल विभाग, ग्रामपंचायत आणि स्थानिक प्रशासन यांच्या समन्वयातून सर्व अडथळे दूर करून घरकुलांची कामे तातडीने पूर्ण करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

लाभार्थ्यांनीही प्रशासनाशी समन्वय ठेवून आवश्यक कागदपत्रे व माहिती वेळेत उपलब्ध करून द्यावी, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# जिल्ह्यात कापूस पेरणीने ओलांडला ५७ टक्क्यांचा टप्पा!

## ३.१६ लाख हेक्टरवर पेरणी पूर्ण

जन सम्राट टाईम्स

**जळगाव। प्रतिनिधी :** जळगाव जिल्ह्यात खरीप हंगामातील कापूस पेरणीला वेग आला असून आतापर्यंत सरासरी ५ लाख ४६ हजार ९३३ हेक्टर क्षेत्रापैकी ३ लाख १६ हजार ९०७.९२ हेक्टर क्षेत्रावर पेरणी पूर्ण झाली आहे. यामुळे जिल्ह्यातील एकूण कापूस पेरणी ५७.९४ टक्क्यांवर पोहोचली असून, आगामी काही दिवसांत पावसाची साथ कायम राहिल्यास उर्वरित क्षेत्रावरील पेरणीही पूर्ण होण्याची शक्यता कृषी विभागाने व्यक्त केली आहे. तालुकानिहाय आढावा घेतल्यास पारोळा तालुका ७९.३३ टक्के पेरणीसह जिल्ह्यात प्रथम क्रमांकावर आहे. त्यानंतर एरंडोल (७६.३७ टक्के), पाचोरा (६९.०५ टक्के), भडगाव (६८.७५ टक्के) आणि अमळनेर (६७.९९ टक्के) या तालुक्यांमध्येही कापूस पेरणीने समाधानकारक प्रगती केली आहे. दुसरीकडे, यावल (१४.५३ टक्के),



बोदवड (२६.९४ टक्के) आणि रावेर (३३.७९ टक्के) या तालुक्यांमध्ये पेरणीचा वेग तुलनेने कमी असल्याने हे तालुके जिल्ह्यात सर्वाधिक मागे असल्याचे चित्र आहे. पावसाच्या अनियमिततेमुळे आणि स्थानिक परिस्थितीमुळे काही भागांत पेरणी रखडल्याचे सांगितले जात आहे. कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, आगामी काही दिवसांत पावसाची परिस्थिती अनुकूल राहिल्यास उर्वरित क्षेत्रावरही पेरणी वेगाने पूर्ण होईल. तसेच शेतकऱ्यांनी हवामानाचा अंदाज लक्षात घेऊन योग्य नियोजन करण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज

# बाळाला नाल्यात टाकल्या प्रकरणी महिलेला कारावास

## डीएनए अहवाल ठरला पुरावा

जन सम्राट टाईम्स

**अमळनेर । प्रतिनिधी :** चोपडा तालुक्यात प्रसूतीनंतर नवजात बाळाला नाल्यात टाकून जीव धोक्यात घातल्याप्रकरणी अमळनेर जिल्हा व सत्र न्यायालयाने एका महिलेला दोषी ठरवत तीन वर्षांच्या सक्त कारावासाची शिक्षा सुनावली आहे. अतिरिक्त सत्र न्यायाधीश छाया पाटील यांनी डीएनए अहवाल, वैद्यकीय पुरावे आणि साक्षीदारांच्या साक्षींच्या आधारे हा महत्त्वपूर्ण निर्णय दिला. ही घटना ६ ऑगस्ट २०२२ रोजी चोपडा तालुक्यातील एका गावात घडली होती.

गावात उत्तरकार्याचा कार्यक्रम सुरू असताना काही ग्रामस्थांना नाल्याकडून नवजात बाळाच्या रडण्याचा आवाज ऐकू आला. संशय आल्याने त्यांनी तात्काळ पोलीस पाटलांना माहिती दिली. पोलीस पाटलांनी घटनास्थळी धाव घेत नाल्यात पडलेल्या नवजात बाळाला बाहेर काढले. त्यानंतर बाळाला कापडात गुंडाळून तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. ग्रामस्थांच्या तत्परतेमुळे बाळाचे प्राण वाचले. या घटनेनंतर चोपडा ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत गावातील नुकत्याच प्रसूत झालेल्या महिलांची माहिती संकलित केली. आशा सेविका आणि आरोग्य कर्मचाऱ्यांच्या मदतीने करण्यात आलेल्या तपासात एका महिलेची प्रसूती झाल्याची अधिकृत नोंद नसल्याचे समोर आले. त्यानंतर संशयित



महिलेची चौकशी करण्यात आली. पुढील तपासादरम्यान संबंधित महिलेने नवजात बाळाला नाल्यात टाकल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी न्यायालयात नमूद केले. याशिवाय डीएनए तपासणीद्वारे बाळ आणि संबंधित महिलेतील नातेही सिद्ध झाले. ग्रामस्थांच्या तत्परतेमुळे बाळाचे प्राण वाचले. या घटनेनंतर चोपडा ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. वैद्यकीय अहवाल, डीएनए चाचणी, पोलीस पाटील, आशा सेविका आणि वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या साक्षी यांसह सादर करण्यात आलेल्या पुराव्यांमुळे आरोपीविरुद्धचे आरोप न्यायालयात सिद्ध झाले. सर्व पुराव्यांचा सखोल विचार करून अतिरिक्त सत्र न्यायाधीश छाया पाटील यांनी संबंधित महिलेला दोषी ठरवत तीन वर्षांच्या कारावासाची शिक्षा सुनावली. या खटल्यात सरकारी पक्षातर्फे ॲड. किशोर बागुल मंगरुळकर यांनी प्रभावीपणे बाजू मांडली. या निकालामुळे नवजात बालकांवरील अत्याचार आणि त्यागाच्या घटनांबाबत न्यायालयाने कठोर भूमिका घेतल्याचे स्पष्ट झाले असून, अशा गुन्ह्यांमध्ये वैज्ञानिक पुरावे आणि साक्षीदारांचे जबाब किती महत्त्वाचे ठरतात, हेही या प्रकरणातून अधोरेखित झाले आहे.

# अंजनी नदीत पाय घसरून तरुणाचा मृत्यू!



जन सम्राट टाईम्स

**कल्याणे होळ । प्रतिनिधी :** धरणगाव तालुक्यातील कल्याणे खुर्द येथील एका ३७ वर्षीय तरुणाचा अंजनी नदीत पाय घसरून बुडाल्याने दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली.

या घटनेमुळे गावात हळहळ व्यक्त होत असून, मृताच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, रणजीत अंकुश भिल (वय ३७, रा. कल्याणे खुर्द) हे शेतातील काम आटोपून दुपारी सुमारे ३ वाजता घरी परतत होते. यावेळी अंजनी नदीवरील पुलावरून जात असताना त्यांचा पाय घसरला आणि ते नदीच्या खोल पाण्यात पडले. खोल पात्रात अडकल्याने त्यांना बाहेर येणे शक्य झाले नाही. घटनेची माहिती मिळताच गावकरी आणि मित्रमंडळाने तत्काळ घटनास्थळी धाव घेत बचावकार्य केले. त्यांना नदीतून बाहेर काढून उपचारासाठी धरणगाव ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना मृत घोषित केल्याचे समजते. रणजीत भिल यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले आणि एक मुलगी असा परिवार असून, त्यांच्या अकाली निधनाने कुटुंबावर मोठे दुःख कोसळले आहे. या घटनेमुळे कल्याणे खुर्द गावात शोककळा पसरली आहे.

# ऑपरेशन 'शोध-४'मध्ये जळगाव पोलिसांना मोठे यश; ३६ बेपत्ता व्यक्तींचा शोध

## २०१८ पासूनच्या बेपत्ता प्रकरणांपैकी ९५ टक्के प्रकरणांचा उलगडा

जन सम्राट टाईम्स

**जळगाव (प्रतिनिधी):** घरातून निघून गेलेले, हरवलेले किंवा विविध कारणांमुळे कुटुंबापासून दूर झालेल्या व्यक्तींचा शोध घेण्यासाठी जळगाव पोलिसांनी राबविलेल्या 'ऑपरेशन शोध-४' या विशेष मोहिमेत उल्लेखनीय यश मिळवले आहे. या मोहिमेदरम्यान ३१ मुले आणि ५ अल्पवयीन मुलींसह एकूण ३६ बेपत्ता व्यक्तींचा शोध घेऊन त्यांना त्यांच्या पालकांच्या किंवा कायदेशीर पालकांच्या स्वाधीन करण्यात आले. तसेच पोलिसांकडे नोंद असलेल्या २२ बेपत्ता अल्पवयीन मुलींचाही यशस्वी शोध लावण्यात आला. महिला व बाल अपराध प्रतिबंध विभागाच्या




अपर पोलीस महासंचालकांच्या निर्देशानुसार ८ ते २३ जून या कालावधीत जिल्हाभर 'ऑपरेशन शोध-४' राबविण्यात आले. या मोहिमेत आश्रयगृहे, स्वयंसेवी संस्था, रेल्वे स्थानके, बसस्थानके, धार्मिक स्थळे, रुग्णालये, हॉटेल्स, दुकाने तसेच कचरा गोळा करणारी किंवा भिक्षा मागणारी मुले आढळणाऱ्या ठिकाणी विशेष तपासणी करण्यात आली. संशयित मुलांची ओळख पटवून त्यांची माहिती अद्ययावत करण्यात आली. अल्पवयीन मुली बेपत्ता झाल्यानंतर दाखल झालेल्या अपहरणाच्या गुन्ह्यांतील २२ मुलींचा शोध घेण्यात पोलिसांना यश आले. याशिवाय नोंद नसलेल्या ३१ मुलांसह ५ मुलींना शोधून त्यांच्या कुटुंबीयांच्या ताब्यात सुरक्षितपणे देण्यात आले. जळगाव जिल्ह्यात २०१८ ते २०२६ या कालावधीत एकूण २,०२७ मुले-मुली बेपत्ता झाल्याची नोंद असून, त्यापैकी १,९२८ जणांचा म्हणजेच ९५.११ टक्के प्रकरणांचा यशस्वी छडा जळगाव पोलिसांनी लावला आहे. उर्वरित ९९ जणांचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिस प्रशासनाने दिली. ही मोहीम पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक संदीप गावित, उपविभागीय पोलीस अधिकारी नितीन गणापुरे, तत्कालीन डीवायएसपी (गृह) प्रदीप ठाकूर, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक राहुल गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली. अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाचे सहायक पोलीस निरीक्षक हरिदास बोचरे, पोलीस उपनिरीक्षक दिनेश बडगुजर आणि त्यांच्या पथकाने ही मोहीम यशस्वीपणे पूर्ण केली.

# विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेत पाचोऱ्याचे बीएलओ साहेबराव चौधरी जिल्ह्यात अव्वल

जन सम्राट टाईम्स

**पाचोरा । प्रतिनिधी :** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राज्यभर राबविण्यात येत असलेल्या स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन (SIR) – विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेत जळगाव जिल्ह्यातील पाचोरा विधानसभा मतदारसंघाने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. होल (ता. पाचोरा) येथील मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) साहेबराव चौधरी यांनी त्यांच्याकडे सोपविण्यात आलेल्या मतदान यादी भाग क्रमांक १२८ चे एसआयआरचे काम १०० टक्के पूर्ण करून जळगाव जिल्ह्यात सर्वप्रथम हा टप्पा पूर्ण करण्याचा मान मिळविला आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, जळगाव यांच्या मार्गदर्शनाखाली आणि मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, पाचोरा भूषण अहिरे यांच्या नियंत्रणाखाली १८ पाचोरा विधानसभा मतदारसंघात विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी घरभेटी देऊन प्रत्येक मतदाराची प्रत्यक्ष पडताळणी करत आहेत.

तसेच एन्युमरेशन फॉर्म (Enumeration Form – EF) चे वितरण, संकलन आणि भारत निवडणूक आयोगाच्या अधिकृत मोबाईल ॲपवर माहितीचे डिजिटायझेशन



करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. पाचोरा विधानसभा मतदारसंघात सध्या ३५४ मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) कार्यरत असून, सर्व अधिकारी नियोजित मुदतीत पुनरीक्षणाचे काम पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील आहेत. या पार्श्वभूमीवर साहेबराव चौधरी यांनी केलेली कामगिरी विशेष उल्लेखनीय मानली जात आहे. साहेबराव चौधरी यांच्या कार्यक्षेत्रातील मतदान यादी भाग क्रमांक १२८ मध्ये एकूण ८८९ मतदार नोंदणीकृत आहेत. त्यापैकी ८८१ मतदारांना एन्युमरेशन फॉर्मचे वितरण, संकलन आणि डिजिटायझेशन यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आले आहे. उर्वरित ८ मतदारांची 'अनकलेक्टेबल' म्हणून नोंद करण्यात आली आहे. अशा प्रकारे संपूर्ण काम शंभर टक्के पूर्ण करून त्यांनी जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी भूषण अहिरे यांनी साहेबराव चौधरी यांचे अभिनंदन करत त्यांच्या कर्तव्यनिष्ठेचे कौतुक केले.

# ज्ञान व शिस्तीच्या पायावरच देशाचा विकास शक्य : डॉ. नेवे

## संसदीय अनुभव मांडले विद्यार्थ्यांसमोर



जन सम्राट टाईम्स

**भुसावळ | प्रतिनिधी :** "आधुनिक जगाचा अभ्यास केल्यावर हे स्पष्ट होते की कोणत्याही देशाचा शाश्वत आणि सर्वांगीण विकास हा त्या देशातील शिक्षण व्यवस्थेतील ज्ञान, शिस्त आणि वैज्ञानिक दृष्टिकोनावर अवलंबून असतो. ज्ञान व शिस्तीच्या भक्कम पायावरच समाज आणि राष्ट्राची खरी प्रगती घडते," असे प्रतिपादन भालोद येथील कला व विज्ञान महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. सुनील नेवे यांनी केले. महाविद्यालयाच्या मराठी विभागातर्फे आयोजित 'माझा ब्रिटनचा प्रवास' या विषयावरील व्याख्यान आणि सत्कार समारंभात ते बोलत होते. नुकतेच ब्रिटनचा संसदीय अभ्यास दौरा करून परतलेल्या प्रा. नेवे यांनी तेथील शिक्षण व्यवस्था, संसदीय लोकशाही आणि सामाजिक शिस्तीचे अनुभव विद्यार्थ्यांसमोर मांडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेकंडरी एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा सौ. हेमलताताई इंगळे होत्या. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. जी. कोल्हे, मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. जतीन मेढे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. प्रा. नेवे म्हणाले की, ब्रिटनमधील विद्यापीठे ही केवळ पदवी प्रदान करणाऱ्या संस्था नसून ज्ञान, संशोधन आणि व्यक्तिमत्त्व विकासाची केंद्रे आहेत. आधुनिक सुविधांनी सुसज्ज ग्रंथालये, संशोधनाला पूरक वातावरण आणि विद्यार्थ्यांमध्ये स्वअभ्यासाची संस्कृती यामुळे तेथील नागरिकांमध्ये ज्ञान, शिस्त आणि विनम्रता या मूल्यांची जपणूक होते. रेल्वे, भूमिगत वाहतूक व्यवस्था, पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन आणि सार्वजनिक सुविधा या सर्व ज्ञान व विज्ञानाच्या बळावर उभ्या राहिलेल्या असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स येथील भेटीचा अनुभवही कथन केला. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी उच्च शिक्षण पूर्ण केलेल्या या जागतिक कीर्तीच्या संस्थेतील ग्रंथालयात बाबासाहेबांची प्रतिमा पाहून प्रत्येक भारतीयाची मान अभिमानाने उंचावते, असे ते म्हणाले. जगाने बाबासाहेबांचे ज्ञान आणि विद्वत्ता ओळखली असली तरी आपण त्यांचे विचार अधिक व्यापकपणे आत्मसात करण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. "ज्ञानाने समृद्ध झाल्याशिवाय समाज आणि देशाची शाश्वत प्रगती शक्य नाही. त्यामुळे प्रत्येकाने ज्ञानार्जनाची वृत्ती जोपासून आयुष्यभर विद्यार्थी राहावे," असे आवाहनही त्यांनी उपस्थितांना केले. या कार्यक्रमास प्रा. डॉ. अजय कोल्हे, डॉ. मुकेश पवार, डॉ. आशुतोष वर्डीकर, प्रा. डॉ. मीनाक्षी वाघुळे, प्रा. मोहिनी तायडे तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जन सम्राट टाईम्स | अँकर न्यूज

# आयुक्त कापडणीस यांच्या पुढाकारातून हरित परिवर्तनाची मुहूर्तमेढ

## ४५० वृक्षांचे वृक्षारोपण; लोकसहभागातून १० हजार वृक्ष लागवडीचा संकल्प

जन सम्राट टाईम्स

**धुळे | प्रतिनिधी:** धुळे शहराला पर्यावरणपूरक, हिरवेगार आणि प्रदूषणमुक्त बनविण्याच्या उद्देशाने आमदार अनुप भैय्या अग्रवाल यांच्या 'हरित धुळे' संकल्पनेला धुळे महानगरपालिकेचे आयुक्त नितीन कापडणीस यांनी कृतीची जोड दिली आहे. त्यांच्या पुढाकारातून नगावबारी येथील वनविभागाच्या टेकडीवर मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण अभियानाची सुरुवात करण्यात आली असून, टेकडीचे हरित क्षेत्रात रूपांतर करण्याचा महत्त्वाकांक्षी संकल्प हाती घेण्यात आला आहे. या अभियानांतर्गत पहिल्याच टप्प्यात टेकडीवर सुमारे ४५० वृक्षांची लागवड करण्यात आली. पुढील काळात या परिसरात १० हजार वृक्षांची लागवड करण्याचा निर्धार करण्यात आला असून, पर्यावरण संवर्धनासाठी लोकसहभागातून ही मोहीम राबविण्यात येत आहे. या उपक्रमासाठी आयुक्त नितीन कापडणीस यांनी प्रभावी नियोजन, विविध विभागांमध्ये समन्वय आणि सातत्यपूर्ण पाठपुरावा केल्याने हा



महत्त्वाकांक्षी प्रकल्प प्रत्यक्षात साकार होत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. या अभियानाला महापौर मायादेवी परदेशी तसेच भाजपचे जिल्हाध्यक्ष गजेंद्र शेठ अंपळकर यांचेही मोलाचे सहकार्य लाभत आहे. प्रभाग क्रमांक १ चे नगरसेवक ललित गंगाधर माळी यांनी या उपक्रमासाठी सातत्याने पाठपुरावा करत स्वखर्चातून तब्बल ६३७ खड्डे तयार करून दिले. त्यामुळे वृक्षारोपणासाठी आवश्यक प्राथमिक तयारी वेळेत पूर्ण होऊन अभियानाला गती मिळाली.

### वृक्ष संरक्षण, संवर्धन करण्यावर विशेष भर

विशेष म्हणजे, हा उपक्रम कोणत्याही सरकारी निधीवर अवलंबून नसून वनविभागाच्या टेकडीवर लोकसहभाग, श्रमदान आणि पर्यावरण संवर्धनाच्या भावनेतून राबविण्यात येत आहे. स्वयंसेवक, नागरिक, महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी मोठ्या उत्साहाने या अभियानात सहभागी झाले. या अभियानात महानगरपालिकेचे पाटकरी साहेब, सर्व स्वच्छता निरीक्षक, दिनेश माळी, बाविस्कर भाऊ तसेच अधिकारी, कर्मचारी आणि पर्यावरणप्रेमींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. वृक्षारोपणासोबतच प्रत्येक वृक्षाचे नियमित संगोपन, संरक्षण आणि संवर्धन करण्यावर विशेष भर देण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले. यावेळी नगरसेवक ललित गंगाधर माळी यांनी सांगितले की, "नगावबारी टेकडीवर १० हजार वृक्ष लागवडीचा संकल्प हा केवळ वृक्षारोपणाचा कार्यक्रम नसून धुळे शहराच्या पर्यावरणीय भवितव्यासाठी सुरू झालेली लोकचळवळ आहे. प्रत्येक नागरिकाने किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन केल्यास धुळे शहराची ओळख हरित शहर म्हणून निर्माण होईल.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306